महाराष्ट्र शासन

## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र : तंशिविकापु/विवि/उपक्रम/२०२१/ ९६९

दिनांक : 23 FEB 2021

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त
सर्व शासकीय व शासकीय अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या संस्था,

विषय : महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांसाठी **"IAS आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला"** हा उपक्रम राबविणेबाबत...

संदर्भ : १. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र.मंत्री/उवतंशि/व्हीआयपी/१०८/२०२१ दि.०८/०२/२०२१.
२. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०/३५५ दि.११/१२/२०२०.
३. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१९/तंशिसं/क्वॉसे/२०२१/१२ दिनांक १२ फेब्रुवारी २०२१.

उपरोक्त विषयाबाबतचे संचालनालयाचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर पत्राची छायाप्रत सोबत जोडलेली आहे. सदर पत्राचे अवलोकन करावे.

तंत्र शिक्षण विभागातून राज्यातील दरवर्षी लाखोंच्या संख्येने पदवीधर होऊन बाहेर पडणाऱ्या युवकांना कौशल्याभिमुख व उद्योजकीय ज्ञानाने परिपूर्ण असे ज्ञान देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये शिकणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रामार्फत खालील दोन अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**१. IAS आपल्या भेटीला          २. उद्योजक आपल्या भेटीला**

सदरचे उपक्रम राज्यभरामध्ये राबविण्यात येत आहेत. महाविद्यालयामधून दरवर्षी बाहेर पडणाऱ्या लाखो पदवीधरांमधून अनेक आयएएस, आयपीएस आणि उद्योजक घडविण्यासाठी हा उपक्रम निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल आणि देशाच्या विकासासाठी हातभार लागेल.

त्या अनुषंगाने, सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेमध्ये उपरोक्त उपक्रमासाठी **'स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र समन्वयकाची'** नेमणूक करावी व त्यांची माहिती **https://forms.gle/QUGDEoAvtcw36rC8A** या लिंकवर जाऊन **दिनांक २४/०२/२०२१ रोजी ११.०० वा.** पर्यंत भरावी.

त्याच प्रमाणे आपणांस सूचित करण्यांत येते की, सदर उपक्रमांची माहिती संस्थेच्या नोटिस बोर्ड व व्हॉटसॲप मेसेजच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोचवावी. नेमणूक करण्यांत येणाऱ्या संस्था समन्वयकांना विद्यार्थ्यांची नोंदणी करताना किंवा प्रत्यक्ष योजना राबविण्याबाबत काही शंका असल्यास अथवा अधिक माहितीसाठी **७५०७६५२५५५** या क्रमांकावर संपर्क साधावा.

(श्री. मा. रा. जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९४१९
ई-मेल-desk19@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १९/तंशिसं/क्वॉसे/२०२१/१२ दिनांक : 12 FEB 2021

प्रति,
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय : महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांसाठी "IAS आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला" हा उपक्रम राबविणेबाबत...

संदर्भ : १) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. मंत्री/उवतंशि/व्हीआयपी/ १०८/२०२१, दि. ०८-०२-२०२१
२) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २ओ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/ २०२०/३५५, दिनांक ११ डिसेंबर, २०२०

तंत्र शिक्षण विभागातून राज्यातील दरवर्षी लाखोच्या संख्येने पदवीधर होऊन बाहेर पडणाऱ्या युवकांना कौशल्याभिमुख व उद्योजकीय ज्ञानाने परिपूर्ण असे ज्ञान देणे आवश्यक आहे. COVID- १९ ही जगावर आलेली एक आपत्ती जरी असली तरी भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये पर्यायाने महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये एक मोठा सकारात्मक बदल झाला तो म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण व्यवस्था आणि प्रशासन हे तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये करत ऑनलाइन शिक्षण-प्रशिक्षणाचा मार्ग अवलंबत आहेत, आता याच धर्तीवर महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये शिकणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रामार्फत खालील दोन अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

## १. IAS आपल्या भेटीला

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग आणि भारतीय प्रशासकीय सेवेच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुणे, दिल्ली याठिकाणी वेगवेगळ्या सुविधा व मान्यवरांचे मार्गदर्शन उपलब्ध असल्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये ग्रामीण भागातून युवक शहरी भागामध्ये येतो. तो थांबवणे त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेसाठी करावा लागणारा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्यात यावा, यासाठी IAS आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत दिल्ली, मुंबई अथवा संपूर्ण भारतामध्ये कार्यरत असणारे प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन दररोज एक याप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देता येईल. प्रत्यक्ष कार्यरत असणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वेगवेगळे अनुभव लोकांना प्रेरणा व प्रोत्साहन तर देतीलच पण त्याचबरोबर युवकांचा प्रशासकीय सेवेमध्ये येण्याचा दृष्टिकोन बदलण्यामध्ये देखील मदत होईल.

## २. उद्योजक आपल्या भेटीला

उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी - उद्योजक आपल्या भेटीला हा उपक्रम महाविद्यालयीन युवक ज्यांना स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करावयाचा आहे, त्यांचे उद्योजकीय कौशल्य वाढीस लागण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चालू असणाऱ्या वेगवेगळ्या संकल्पनांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या दृष्टिकोनातून

"उद्योजक आपल्या भेटीला" हा उपक्रम राज्यभरामध्ये राबविण्यात येत आहे. महाविद्यालयातून दरवर्षी बाहेर पडणाऱ्या लाखो पदवीधरांमधून अनेक आयएएस, आयपीएस आणि उद्योजक घडवण्यासाठी हा उपक्रम निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल आणि देशाच्या विकासासाठी हातभार लागेल.

याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, सदरचे उपक्रम राबविण्याकरीता आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना कळविण्यांत यावे. तसेच संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ११ डिसेंबर, २०२० च्या पत्रान्वये संस्थेत कार्यरत असलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयकांकडून सदरचे उपक्रम राबविण्याबाबत सर्व संस्थांना सूचित करण्यांत यावे.

त्याचप्रमाणे सदर उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्था यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी आपल्या कार्यालयात एका समन्वयकाची नियुक्ती करावी व त्यांचे मार्फत संस्था स्तरावरील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयकांची माहिती आपल्या स्तरावर संकलित करुन ती खालील तक्त्यामध्ये भरुन careerkatta365@gmail.com या-मेल आयडीवर दिनांक १६-२-२०२१ पूर्वी पाठविण्याची कार्यवाही करावी. तसेच त्यांची प्रत desk19@dtemaharashtra.gov.in या-मेल आयडीवर सादर करावी.

| विभागीय कार्यालयाचे नांव : | | |
|---|---|---|
| समन्वयकाचे नांव | मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी |
| | | |

| महाविद्यालयाचे नांव : | | | | |
|---|---|---|---|---|
| उपक्रम | समन्वयकाचे नांव | मोबाईल क्रमांक | व्हॉट्स अप क्रमांक | ई-मेल आयडी |
| IAS आपल्या भेटीला | | | | |
| उद्योजक आपल्या भेटीला | | | | |

सदर उपक्रमाची संकल्पना, उद्दिष्ट्ये, कार्यपध्दती, नोंदणी, व्यवस्थापकीय रचना इत्यादीबाबतची तपशीलवार माहिती सोबत जोडली आहे. सदरच्या माहितीचे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे सदरच्या उपक्रमांची माहिती संस्थेच्या नोटीस बोर्ड व व्हॉटस्अप मेसेजच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याबाबतही संस्थांना कळविण्यांत यावे. संस्थांमधील समन्वयकांना विद्यार्थ्यांची नोंदणी करताना किंवा प्रत्यक्ष योजना राबविण्याबाबत काही शंका असल्यास अथवा अधिक माहितीसाठी 7507652555 या क्रमांकावर संपर्क साधावा.

**सोबत :** उपक्रमाचे तपशीलवार सादरीकरण (नोंदणी करीता आवश्यक असणाऱ्या लिंकसह)

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई